<u>नियमित दिवाणी मुकदमा नं.२६१/२०१३ – निशाणी १०२ लगत आदेश</u>

सुप्रिया प्रकाश गावडे वि. रामचंद्र नामदेव मिसाळ इ.

CNR No. MHSO20-001035-2013

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१० ते १२ तर्फे दाव्यास कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ होणेसाठी दाखल केलेला आहे. सदर प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे, प्रतिवादी यांना जुनी महत्वाची कागदपत्रे न मिळाल्यामुळे प्रतिवादी यांना मुदतीत कैफियत देता आली नाही. त्यामुळे प्रतिवादी यांना कैफियत देणेसाठी सुमारे २ महिने विलंब झालेला आहे. सदरचा विलंब प्रतिवादी क्र.१० ते १२ यांनी जाणुन बुजून केलेला नाही. सबब, अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

२. प्रस्तुत अर्जास वादी यांनी त्यांचे म्हणणे मांडले की, सदरचा अर्ज खोटा, लबाडीचा दिशाभूल करणारा असून तो प्रस्तुत वादीस मुळीच मान्य व कबुल नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा.

३. वादी, प्रतिवादींतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादीने सदरचा दावा प्रतिवादींचे विरुध्द सरस निरस मानाने वाटप होवुन पृथ्थक कब्जा मिळणेचा दाखल केलेला आहे. वादी, प्रतिवादींचे कथन पाहता व दाव्याचा विषय विचारात घेता दोन्ही पक्षकारांना ऐकण्याची संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सदर प्रतिवादी मुदतीमध्ये कैफियत दिलेले नाही ही बाब स्पष्ट आहे. परंतु सदरचा अर्ज मंजुर केल्याने दाव्याचा विषय गुणदोषावर निर्गत करणेसाठी मदतच होणार

आहे. याउलट अर्ज नामंजूर केल्याने प्रक्रियात्मक विलंब वाढणार आहे. अर्ज मंजूर केल्याने वादीचे नुकसान होणार नाही. परंतु विलंबाचा कालावधी लक्षात घेता खर्च सदर प्रतिवादी क्र.१० ते १२ यांचेवर ठेवणे योग्य आहे. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो –

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज (नि.क्र.१०२) प्रतिवादी क्र.१० ते १२ यांनी वादी यांना रक्कम रु.२००/– (दोनशे रुपये) देण्याच्या अटीवर मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी क्र.१० ते १२ यांना कैफियत दाखल करण्यास परवानगी देणेत येते.

दिनांक – १९/०१/२०२४

( सौ. बी. एम. पोतदार )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
सांगोला.